# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.12.2025** **वारःगुरुवार**

---

1. रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमिर पुतीन आज भारत दौऱ्यावर
2. संचार साथी ॲप आपल्या मोबाईलवर असणे ऐच्छिक असल्याची केंद्र सरकारची स्पष्टोक्ती
3. छत्तीसगडमध्ये, काल झालेल्या चकमकीत बारा माओवादी ठार, तीन जवान शहीद आणि
4. भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यान 50 षटकांच्या दुसऱ्या क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिका संघ विजयी

**भारत-रशिया**

23 व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आज नवी दिल्लीत भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दोन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, राष्ट्रपती पुतिन उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करतील. दोन्ही नेते परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय करतील. व्यापार, अर्थव्यवस्था, आरोग्यसेवा, शैक्षणिक, संस्कृती आणि माध्यमांशी संबंधित अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची अपेक्षा आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूही पुतीन यांची भेट घेणार असून त्यांच्या सन्मानार्थ मेजवानीचे आयोजन करण्यात आलं आहे. या भेटीमुळे भारत आणि रशियाच्या नेतृत्वाला द्विपक्षीय संबंधांमधील प्रगतीचा आढावा घेण्याची, 'विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारी' मजबूत करण्यासाठी दृष्टिकोन निश्चित करण्याची संधी आहे. भारत आणि रशियादरम्यानची वार्षिक स्तरावर आतापर्यंत 22 शिखर परिषदा झाल्या आहेत.

**राजनाथ सिंग**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि रशियाचे संरक्षणमंत्री आंद्रेई बेलौसोव्ह आज नवी दिल्लीत भेटणार आहेत. भारत आणि रशियादरम्यान आंतर-सरकारी लष्करी तांत्रिक सहकार्यासाठीच्या मंत्रिस्तरीय बैठक होणार आहे. अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात दिली आहे. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा अपेक्षित आहे.

**ज्ञानेश कुमार**

पुढील वर्षासाठी आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक सहायक संस्थेच्या अर्थात IDEA परिषदेच्या अध्यक्षपदी भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती झाली आहे. भारत हा संघटनेच्या 14

संस्थापक सदस्य देशांपैकी एक आहे. कुमार यांनी स्वीडनमधील स्टॉकहोम इथं अध्यक्षपदाची सुत्र स्वीकारली. स्वीडनमधील भारताचे राजदूत अनुराग भूषण या समारंभात उपस्थित होते.

**संचारसाथी ऍप**

संचार साथी ऍपचा जास्तीत जास्त नागरिक स्वीकार करत असल्याच्या पार्श्वभूमीवर हे ऍप उत्पादकांनी आधीपासूनच मोबाईलमध्ये इन्स्टॉल करणं ऐच्छिक करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. नागरिकांनाही हे ऍप त्यांना हवं तेव्हा मोबाईलमधून काढून टाकता येईल. तसंच या ऍपचा वापरकर्त्याच्या सुरक्षेशिवाय इतर कोणताही उपयोग नाही असंही सरकारनं स्पष्ट केलं. या ऍपमुळे फसवणूक रोखण्यात यश आल्याचं संसदेत सांगताना केंद्रिय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले....

**इस ऐप और पोर्टल के आधार पर डेढ़ करोड़ मोबाइल कनेक्शन देश के अंदर डिस्कनेक्ट हुए हैं जो फ्रॉडुलेंट हैं। करीब छब्बीस लाख स्टोलन हैंडसेट हम लोगों ने ट्रेस किए और इकतालीस लाख मोबाइल कनेक्शन डिस्कनेक्ट हुए हैं। छह लाख फ्रॉड हम लोगों ने ब्लॉक किए हैं।**

**नौदल दिवस**

भारतीय नौदल स्वदेशी तंत्रज्ञानात प्रगती करत राहील आणि विकसित भारताच्या उभारणीच्या राष्ट्राच्या ध्येयात महत्त्वपूर्ण योगदान देईल असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल काढले. नौदल दिनाच्या पूर्वसंध्येला तिरुअनंतपुरम इथं नौदलाच्या ऑपरेशनल प्रात्यक्षिकांना संबोधित करताना त्या बोलत होत्या. भारतीय नौदलाचा पराक्रम, धैर्य, शिस्त आणि समर्पणामुळे देशाच्या सागरी सीमा सुरक्षित आहेत. त्यांच्या अदम्य पराक्रमाचा गौरव करण्यासाठी नौदल दिवस साजरा केला जातो. 1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धात भारतीय नौदलाने 'ऑपरेशन ट्रायडंट' मुळे भारतीय सेनेला विजय मिळाला. या शौर्याची आठवण म्हणून आज विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे. या वर्षी, केरळमधील तिरुअनंतपुरम इथं शांगुमुघम समुद्रकिनाऱ्यावर शानदार, दिमाखदार प्रात्यक्षिकाने नौदल दिन आज साजरा केला जात आहे.

**वैष्णव-एआय**

नागरिकांच्या वैयक्तिक माहितीच्या गोपनीयतेसाठी संसदेनं डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा केल्याचं इलेक्ट्रॉनिक्स तसंच माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सांगितलं. ते लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. कृत्रिम बुद्धीमत्ता ऍप आणि कृत्रिम बुद्धीमत्ता प्रारुपे यांनाही या कायद्याच्या कक्षेत आणलं असल्याचं ते म्हणाले

**लोकसभा**

लोकसभेने केंद्रीय उत्पादन शुल्क (सुधारणा) विधेयक, 2025 ला काल मंजूरी दिली. प्रस्तावित कायद्याचा उद्देश केंद्रीय उत्पादन शुल्क कायदा, 1944 मध्ये सुधारणा करणे हा आहे. सिगारेट, सिगार, हुक्का तंबाखू, चघळण्याचा तंबाखू, जर्दा आणि सुगंधित तंबाखू यांसारख्या तंबाखू उत्पादनांवरील उत्पादन शुल्क आणि उपकर वाढवला जाणार आहे. हा नवीन कायदा नाही आणि अतिरिक्त करही नाही असं केंद्रिय अर्थमंत्री

निर्मला सीतारमण यांनी विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना काल लोकसभेत स्पष्ट केलं. हा उपकर नाही तर उत्पादन शुल्क आहे आणि वस्तू आणि सेवाकर लागू होण्यापुर्वी तो अस्तित्वात होता. असंही त्या म्हणाल्या.

**<u>माओवादी</u>**

छत्तीसगडमध्ये, बिजापूर जिल्ह्यात काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत बारा माओवादी ठार झाले आणि तीन सुरक्षा कर्मचाऱ्यांनीही आपले प्राण गमावले आहेत, तर या चकमकीत दोन जण जखमी झाले आहेत. बिजापूर-दंतेवाडा सीमेवर माओवादी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर दंतेवाडा आणि बिजापूर जिल्हा राखीव रक्षक, विशेष कार्य दल, कोब्रा युनिट आणि सीआरपीएफ यांच्या संयुक्त पथकाने परिसरात शोध मोहीम सुरू केली. या भागातून रायफल्स आणि इतर स्फोटकं जप्त करण्यात आली आहेत.

**<u>श्रीलंका</u>**

श्रीलंकेतील दितवा चक्रिवादळाच्या तडाख्यानंतर भारतीय हवाईदलाच्या वतीने तात्पुरत्या स्तरावर दळणवळणाची सुविधा पुरवणाऱ्या बेली ब्रीज आणि सागर बंधू मोहिमेअंतर्गत 500 जल शुध्दीकरण संच काल प्रदान केले. चक्रीवादळानंतर मदत आणि बचावकार्याला वेग आला असून या परिसरातील रस्ते जोडणी पूर्ववत करण्यास हा पूल मदत करेल. असं परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे. दितवा चक्रीवादळामुळे श्रीलंकेत आतापर्यंत 479 जणांचा मृत्यू झाला असून 350 जण बेपत्ता आहेत. वादळामुळे श्रीलंकेत मोठ्या प्रमाणात पूर, भूस्खलन आणि पायाभूत सुविधां ढासळल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. 'ऑपरेशन सागर बंधू' अंतर्गत मानवतावादी मदतीसाठीच्या मोहिमेचा विस्तार करण्यात आला असून मदतकार्यासाठी भारतीय सुरक्षा दलाच्या हवाई, समुद्र आणि जमिनीवरील सेवाही तैनात करण्यात आली आहे.

**<u>ट्रंप</u>**

ट्रम्प प्रशासनाने एच-1बी व्हिसा अर्जदारांसाठी तपासणी नियमांची व्याप्ती आणखी वाढवली आहे. अमेरिकन कॉन्सुलर अधिकाऱ्यांना कोणत्याही कामासाठी अर्जदारांच्या रिज्युमे आणि समाजमाध्यमावरील प्रोफाइलचे पुनरावलोकन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चुकीची माहिती पसरवणारे कंटेंट मॉडरेशन, चुकीची माहिती देणारे काम किंवा ऑनलाइन सुरक्षितता धोका निर्माण करणे यासारख्या कारवायांध्ये सहभागी असलेले अर्जदार अपात्र मानले जाऊ शकतात. अशी माहिती अमेरिकेच्या परराष्ट्र विभागानं दिली आहे.

**<u>फिनलंड</u>**

पाकिस्तानमधील दूतावास बंद करण्याच्या फिनलंडच्या निर्णयाचे प्रमुख बलुच मानवाधिकार नेते मीर यार बलोच यांनी स्वागत केलं आहे. इस्लामाबादच्या प्रशासनातील अपयश आणि बिघडत्या सुरक्षा वातावरणाबद्दल ही कारवाई गंभीर चिंता व्यक्त करत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं आहे. फिनलंडच्या परराष्ट्र मंत्रालयाने 28 नोव्हेंबर रोजी इस्लामाबाद, काबूल आणि यांगूनमधील फिनलंडचे दूतावास 2026 मध्ये बंद करण्याची घोषणा केल्यानंतर त्यांनी हे विधान केले. मानवाधिकार कार्यकर्त्यांनी अफगाण सरकारच्या व्यापार स्थगित करण्याच्या आणि ड्युरंड लाइन क्रॉसिंग बंद करण्याच्या निर्णयाचंही स्वागत केलं, या भागाचा वापर पाकिस्तानी अधिकारी आणि ISI, अनधिकृत कारवायांसाठी करत असल्याचे त्यांनी म्हटलं आहे.

**बालविवाह**

बालविवाहमुक्त भारत उपक्रमाच्या वर्षपूर्तीनिमित्त केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालय आजपासून बालविवाहमुक्त भारतासाठी 100 दिवसांची  जागरुकता मोहीम सुरू करणार आहे. दिल्लीत विज्ञान भवनात केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी आणि राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांच्या उपस्थितीत याची सुरुवात होणार आहे. 27 नोव्हेंबरला या मोहिमेची वर्षपूर्ती झाली आहे. येत्या 8 मार्च 2026 पर्यंत 100 दिवसांच्या मोहिमेची तीन टप्प्यांत रचना करण्यात आली आहे.

**पान-मसाला**

केंद्र सरकारने पान मसाला उत्पादकांना सर्व प्रकारच्या पान मसाल्याच्या पाकिटावर किरकोळ विक्री किंमत दर्शविण्यास बंधनकारक केलं आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, या सुधारणा कायदेशीर मापनशास्त्र सुधारणा नियम, 2025 अंतर्गत करण्यात आल्या आहेत. सुधारित नियम पुढील वर्षी 1 फेब्रुवारीपासून लागू होतील.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यान काल रायपूर इथं झालेल्या 50 षटकांच्या क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारताचा 4 गडी राखून पराभव केला. तीन सामन्यांच्या मालिकेतील हा दुसरा सामना होता. विजयासाठी 359 धावांचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेने 4 चेंडू शिल्लक असताना 6 बाद 362 धावा केल्या. एडेन मार्करामने केलेल्या 110 धावा आणि मॅथ्यू ब्रीट्झकेने 68 धावांच्या जोरावर पाहुण्या संघाने सामना जिंकला. भारताकडून अर्शदीप सिंग आणि प्रसिध कृष्णा यांनी प्रत्येकी 2 गडी बाद केले. ऋतुराज गायकवाडने 83 चेंडूत 105 धावा तर विराट कोहलीने 93 चेंडूत 102 धावा केल्या. तीन सामन्यांची मालिकेत दोनही संघांची 1-1 अशी बरोबरी आहे. मालिकेतील अंतिम सामना येत्या शनिवारी विशाखापट्टणम इथं खेळला जाईल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार